Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2412IV01V12P0011

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII

# दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांचे आर्थिक व सामाजिक अध्ययन विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्हा

**निलेश अरूण दूर्गे**
अर्थशास्त्र विभाग (सहाय्यक प्राध्यापक),
भगवंतराव कला व विज्ञान महाविद्यालय,
एटापल्ली, जि.गडचिरोली
मो.नं: 9421115541

**गोषवारा :**

*महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा बहुसंख्येने आदिवासी आणि मागासलेला जिल्हा म्हणून ओळख असल्याने जिल्हयात दारिद्रय लोकसंख्या अधिक प्रमाणात आहे. जिल्हयात जंगल व्याप्त भागावर आधारित मोठे उद्योग नसल्याने जिल्हयात बेरोजगारीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे. त्यामुळे जिल्हयातील बहुसंख्य दारिद्रय रेषेखालील लोक आर्थिक मागासलेले जीवन जगत आहे तसेच जिल्हयात रस्ते आणि वाहतुकीच्या अडचणी सुद्धा आहेत. ज्यामुळे नवीन व्यापार आणि व्यवसायातून रोजगार निर्मितीला चालना मिळताना आर्थिक अडचणी येत आहे. सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनेत गरिबी हटावचा नारा देऊन विविध दारिद्रय निर्मूलनाचे कार्यक्रम सुरू केले. आज सुद्धा गडचिरोली जिल्हयात भारत सरकार आणि स्वयंसेवी संघटना (एनजीओ) द्वारे विविध योजना राबवून आर्थिक मागासलेपण दूर करण्याचा प्रयत्न करताना दिसून येते. महाराष्ट्रातील इतर जिल्हयातील दारिद्र्याची तुलना करता गडचिरोली जिल्हयात अधिक दारिद्रय आहे. यामुळे जिल्हयातील* ***BPL*** *लोकांचे आर्थिक दारिद्रय दूर करण्याकरिता आणि जिल्हयातील पायाभूत सुविधांच्या कमतरतेचे आर्थिक व सामाजिक अध्ययन करण्याची गरज आहे.*

**बीजशब्द** :- दारिद्रय रेषा, दारिद्रय निर्मुलन, आदिवासी, स्वयंसेवी संघटना (**NGO)**

**प्रस्तावना :**

सध्या जगात असणाऱ्या अनेक समस्येपैकी सर्वात महत्वाची समस्या म्हणजे दारिद्रय होय. दारिद्रय ही सापेक्ष कल्पना आहे. दारिद्रय ही केवळ आर्थिक समस्याच नाही, तर ती सामाजिक समस्येबरोबरच राजकीय व प्रशासकीय समस्या देखील आहे. कारण दारिद्रयामुळे गुन्हेगारी, आत्महत्या, घटस्फोट, भिक्षावृत्ती यासारख्या अनेक समस्या उद्भवतात. या कारणामुळे देशाचा आर्थिक व सामाजिक विकास खुंटतो. म्हणूनच दारिद्रय ही अत्यंत गंभीर समस्या असून यावर विचार होणे आवश्यक आहे. अमर्त्य सेन यांच्या मते, व्यक्तिने जोपासलेल्या मूल्याप्रमाणे जगता न येणे म्हणजे दारिद्रय होय. याचा अर्थ, व्यक्तीचे आर्थिक, सामाजिक आणि नैतिक गरजा पूर्ण न होणे म्हणजे दारिद्रय समजले जाते. महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा आदिवासी आणि जंगलव्याप्त भाग असून जिल्हयातील लोकांना योग्य सुविधा मिळताना दिसून येत नाही, तसेच जिल्हयातील जंगलावर आधारित मोठा व्यावसायिक उद्योगाचा अभाव असल्याने जिल्हयात मोठ्या प्रमाणात रोजगाराचा अभाव आहे. परिणामी गडचिरोली जिल्हयात दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण ग्रामीण भागासाठी **54.7** टक्के कुटूंबे असुन शहरी भागात **BPL** 28.3 टक्के कुटूंबे आर्थिक मागासलेले जीवन जगत आहे.

**संशोधनाचे उद्दीष्टये :**

1. गडचिरोली जिल्हयातील **BPL** कुटुंबाच्या आर्थिक मागासलेपणाचे अध्ययन करणे.

2. गडचिरोली जिल्ह्यातील प्राथमिक पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे.
3. गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयांच्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीला जबाबदार असलेल्या घटकांचे अध्ययन करणे.

**गुहितके :**

1. जिल्ह्यात डोंगराळ आणि जंगलव्याप्त भाग असल्यामुळे दारिद्रय निर्मुलनात अळथळे येतात.
2. गडचिरोली जिल्ह्यात BPL कुटुंबीयांचे आर्थिक परिस्थिती कमकुवत आहे.
3. गडचिरोली जिल्ह्यात विविध शासकीय योजनांमुळे BPL कुटुंबीयांचे प्रमाण कमी होत आहे.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे. प्राथमिक माहितीकरिता प्रत्यक्ष मुलाखती, प्रश्नावली आणि निरीक्षण करण्यात आले. गडचिरोली जिल्ह्यातील सर्व 12 तालुक्याचे नमुना निवडीद्वारे सर्वेक्षण करण्यात आले. सहेतुक पद्धतीने प्रत्येक तालुक्यातील 60 बीपीएल कुटुंबातील उत्तरदात्याची सर्वेक्षणाकरिता निवड केल्या गेली. दुय्यम माहितीकरिता विविध कार्यालय, पुस्तके, माहिती, वर्तमानपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित प्रबंध, शासकीय अहवाल व इंटरनेटमधून माहिती घेण्यात आली आहे.

**गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची टक्केवारी :**

महाराष्ट्रातील गडचिरोली हा आदिवासी बहुल असलेला जिल्हा आहे. त्यामुळे जिल्ह्यात BPL कुटुंब अधिक आहे. परिणामी जिल्ह्यातील BPL कुटुंबाची समस्या सोडवताना त्यांचे उत्पन्नाचे साधन, अन्नधान्य तसेच अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजांची पूर्तता होणे आवश्यक आहे. दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचे दरडोई उत्पन्न किती आहे? ते सभोवतालच्या बदललेल्या जीवनशैलीशी कसे जुळवून घेतात? याचाही तेवढाच विचार करणे गरजेचे आहे.

| अ.क्र. | तालुका | गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे | |
|---|---|---|---|
| | | दारिद्रय रेषेखालील कुटुंबे | तालुका निहाय एकूण लोकसंख्येपैकी दारिद्रय रेषेखालील कुटुंबाची टक्केवारी (मूल्य 2002) |
| 1 | देसाईगंज | 5086 | 40.74 % |
| 2 | आरमोरी | 9025 | 42.35 % |
| 3 | कुरखेडा | 11114 | 60.36 % |
| 4 | कोरची | 4854 | 57.42 % |
| 5 | धानोरा | 8638 | 49.64 % |
| 6 | गडचिरोली | 13833 | 64.29 % |
| 7 | चामोर्शी | 19220 | 51.36 % |
| 8 | मूलचेरा | 4794 | 55.20 % |
| 9 | एटापल्ली | 4855 | 35.85 % |
| 10 | भामरागड | 3880 | 64.66 % |

| | | | |
|---|---|---|---|
| 11 | अहेरी | 15458 | 68.12 % |
| 12 | सिरोंचा | 11781 | 66.00 % |
| | **एकूण जिल्हा** | **112538** | **54.69** % |

**स्त्रोत** : तालुका निवड निर्देशक जिल्हा गडचिरोली 23-2022, पृष्ठ क्र.14

गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण भागातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबांची टक्केवारी दर्शविण्यात आली आहे. गडचिरोली जिल्ह्यातील तालुका निहाय एकूण लोकसंख्येपैकी सर्वाधिक दारिद्रयरेषेखालील कुटुंबे 68.12 टक्के अहेरी तालुक्यातील आहे तर सिरोंचा तालुक्यात .66 टक्के, भामरागड तालुक्यात 64.66 टक्के आणि गडचिरोली तालुक्यात 64.29 टक्के मोठ्या प्रमाणात दारिद्रयरेषेखालील कुटुंबे असल्याचे आढळून आले. गडचिरोली जिल्ह्यातील सर्वात कमी 35.85 टक्के दारिद्रयरेषेखालील कुटुंबे एटापल्ली तालुक्यातील आहे, तर देसाईगंज तालुक्यात 40.74 टक्के, आरमोरी तालुक्यात 42.35 टक्के आणि धानोरा तालुक्यात 49.64 टक्के दारिद्रयरेषेखालील कुटुंबे असल्याचे आढळून आले. त्यामुळे जिल्ह्यातील बीपीएल कुटुंबातील आर्थिक कमतरतेचे कारणे आणि प्राथमिक सुविधाच्या मिळविण्याकरिता आर्थिक घटकाचा अभ्यास गरजेचा आहे.

**सारणी क्र.** 1

**उत्तरदात्यांचे कुटुंब दारिद्र्यांशी सामना किती पिढ्यापासून आहे हे दर्शविणारा तक्ता**


| **अ.क्र.** | **दारिद्र्यांशी सामना किती पिढ्यापासून आहे?** | **कुटुंबाची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | 1 पिढी | 44 | 6.11 |
| 2 | 2 पिढी | 91 | 12.64 |
| 3 | 3 पिढी | 339 | 47.08 |
| 4 | 4 पिढी | 246 | 34.17 |
| | **एकूण** | **720** | **100** |

(स्रोत:- गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीनुसार तीन पिढ्यापासून दारिद्रयात घालवणाऱ्या कुटुंबाची संख्या 339 म्हणजे 47.08 टक्के प्रमाण असून त्यानंतर चार पिढ्यापासून दारिद्रयात घालवणाऱ्या कुटुंबाची संख्या 246 म्हणजेच 34.17 टक्के प्रमाण इतकी असून एक आणि दोन पिढ्यापासून दारिद्रयात जीवन व्यतीत करणाऱ्यांची संख्या ही अनुक्रमे 44 कुटुंब आणि 91 कुटुंब अशी आहे. यावरून असे लक्षात येते की, सर्वाधिक तीन पिढ्या पासून दारिद्रयात जीवन व्यथित घालवणाऱ्या एकूण कुटुंबाचे प्रमाण 47.08 टक्के हे अधिक आहे. कारण गडचिरोली जिल्ह्यात औद्योगिक मागासलेपणा आणि व्यवसायिक शिक्षणाचे कमी प्रमाण आहे. परिणामी जिल्ह्यातील बहुसंख्य कुटुंब बीपीएल मध्ये जीवन जगत आहे.

**आलेख क्र.** 1

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–IV(I), Volume–XII




(स्रोत:- गडचिरोली जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

**सारणी क्र.** 2

**पुढील भौतिक सुविधापैकी कोणत्या सुविधा तुमच्याकडे आहेत?**

| **क्र.** | **तपशील** | **वारंवारिता (दारिद्रय रेषेखालील कुटुंब)** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1. | विज | **292** | **40.56%** |
| 2. | गॅस | **198** | **27.5%** |
| 3. | घर | **551** | **76.53%** |
| 4. | टेलिव्हिजन | **243** | **33.75%** |
| | एकुण | **720** | |

(स्रोत:- गडचिरोली जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

वरील सारणीत दारिद्रयरेषेखालील **40.56%** कुटुंबीयांकडे विज सारख्या भौतिक सुविधा असून केवळ **27.5%** कुटुंबीयांकडे गॅसची सुविधा उपलब्ध आहे तर **76.53%** कुटुंबीयांकडे स्वतःचे घर आहे आणि **33.75%** दारिद्रयरेषेखालील कुटुंबाकडे टेलिव्हिजन (**T.V.**) असल्याचे दिसून येत आहे**.** यावरून असे लक्षात येते की**,** गडचिरोली जिल्हयातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबीयांना विविध भौतिक सुविधा पासून अजूनही वंचित असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे गडचिरोली जिल्हयात अप्रगत आणि मागासलेपणा मोठ्या प्रमाणात दिसत आहे**.**

**सारणी क्र.** 3

**उत्तरदात्यांना शेतीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती होते हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **शेतीमधून मिळणारे वार्षिक उत्पन्न किती होते?** | **वारंवारिता (दारिद्रय रेषेखालील कुटुंब)** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | 10,000 ते 20,000 | 156 | 21.67 |
| 2 | 20,000 ते 50,000 | 486 | 67.5 |
| 3 | 50,000 ते 1 लाख | 78 | 10.83 |
| 4 | 1 लाखपेक्षा जास्त | 0 | 0 |
| | **एकूण** | **720** | **100** |

(स्रोत:- गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

सारणी क्र.3 नुसार शेतीमधून 20,000 ते 50,000 वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या उत्तरदात्याची संख्या ही सर्वाधिक 486 म्हणजेच 67.5 टक्के प्रमाणे इतकी आहे. त्यानंतर 10,000 ते 20,000 वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या उत्तरदात्याची संख्या 21.67 टक्के प्रमाण तर 50,000 ते एक लाख वार्षिक उत्पन्न मिळण्याची संख्या केवळ 10.83 टक्के एवढी आहे. मात्र एक लाख रुपये पेक्षा अधिक उत्पन्न मिळणाऱ्या उत्तरदात्याची संख्या शून्य आहे. गडचिरोली जिल्ह्यातील आपल्या वार्षिक उत्पन्नात वाढ करण्याकरिता सरकारने शेतीपूरक व्यवसाय आणि योग्य रोजगाराला चालना देणे गरजेचे आहे. ज्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबीयांचे वार्षिक उत्पन्न वाढ होण्यास मदत होईल

**सारणी क्र.** 4

**कर्ज घेतले असल्यास कोणाकडून हे दर्शविणारा तक्ता**

| **अ.क्र.** | **कर्ज घेतले असल्यास कोणाकडून?** | **वारंवारिता (दारिद्रय रेषेखालील कुटुंब)** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | बचतगट | 111 | 40.22 |
| 2 | सहकारी पतसंस्था | 100 | 36.23 |
| 3 | राष्ट्रीयकृत बँक | 23 | 8.33 |
| 4 | सावकार | 24 | 8.7 |
| 5 | इतर | 18 | 6.52 |
| | **एकूण** | **276** | **100** |

(स्रोत:- गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

सारणी क्र.**4** नुसार बचत गटाकडून कर्ज घेणाऱ्याची संख्या 111 कुटुंबे म्हणजेच 40.22 % प्रमाण हे सर्वाधिक असून सहकारी पतसंस्था मधून कर्ज घेणाऱ्यांची संख्या 100 कुटुंबे म्हणजेच 36.23% प्रमाण अशी दाखविण्यात आली आहे. त्यानंतर राष्ट्रीयकृत बँकांकडून 23 कुटुंबांनी म्हणजेच 8.33% तर सावकारकडून कर्ज घेणाऱ्यांची संख्या केवळ 8.7 टक्के इतके प्रमाण आहे**,** आणि इतर संस्थांकडून कर्ज घेणाऱ्यांची संख्या ही केवळ 18 कुटुंबे म्हणजेच 6.22 टक्के अशी आहे.

**सारणी क्र.** 5

**स्वयंसेवी संघटनाच्या** (NGO) **माध्यमातून मिळालेल्या योजनेचा लाभ झाला आहे काय**?

| **क्र.** | **तपशील** | **दारिद्रय रेषेखालील कुटुंब** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1. | होय | 108 | 15% |
| 2. | नाही | 612 | 85% |
| | **एकूण** | **720** | **100%** |

(स्रोत:- गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

सारणी क्र.**5** नुसार जिल्ह्यातील दारिद्रयरेषेखालील कुटुंबियांना स्वयंसेवी संघटनेच्या (NGO) माध्यमातून केवळ **15** टक्के कुटुंबीयांना योजनेचा लाभ मिळालेला आहे तर **85** टक्के दारिद्रयरेषेखालील कुटुंबियांना स्वयंसेवी संघटनेच्या (NGO) माध्यमातून योजनेचा लाभ मिळालेला नाही**.** यावरून असे लक्षात येते की गडचिरोली

जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाचा आर्थिक विकास होण्यासाठी सरकारने विविध योजनांचा लाभ द्यावा जेणेकरून त्यांची आर्थिक स्थिती अधिक सुदृढ होण्यास मदत होईल.

**सारणी क्र.** 6

**शासकीय विकास योजनांपैकी कुटुंबीयांनी किती योजनांचा लाभ घेतला हे दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | शासकीय विकास योजनांपैकी किती योजनांचा तुम्ही तुमचे कुटूंबीय लाभ घेतला आहे.? | वारंवारिता (दारिद्रय रेषेखालील कुटुंब) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | 1 योजना | 433 | 63.58 |
| 2 | 2 योजना | 189 | 27.75 |
| 3 | 3 योजना | 47 | 6.9 |
| 4 | 4 योजना | 7 | 1.03 |
| 5 | 5 योजना | 5 | 0.74 |
| 6 | 6 योजना | 0 | 0 |
| 7 | 6 पेक्षा अधिक योजना | 0 | 0 |
| | **एकूण** | **681** | **100** |

(स्रोत:- गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील **720** कुटुंबीयांकडून प्राप्त प्रश्नावली)

सारणी क्र.**6** नुसार शासकीय विकास योजनेचा लाभ सर्वाधिक संख्या ही एकच योजना मिळणाऱ्यांची संख्या **433** कुटुंब लाभार्थी म्हणजेच **63.58** टक्के इतके प्रमाण आहे. तर दोन योजनेचा लाभ मिळविणाऱ्याची संख्या ही **189** लाभार्थी म्हणजेच **27.75** टक्के प्रमाण आहे. तसेच तीन योजनेचा लाभ घेणाऱ्याची संख्या ही **47** लाभार्थी म्हणजेच **6.9** टक्के प्रमाण तर चार योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या **7** लाभार्थी आणि पाच योजनेचा लाभ घेणाऱ्यांची संख्या **5** लाभार्थी असून सहा योजना आणि सहापेक्षा अधिक योजनांचा लाभ घेणाऱ्याची संख्या शून्य आहे. म्हणजेच योजना पोहोचण्याचे प्रमाण हे अत्यल्प असल्याचे दिसून येत आहे.

**निष्कर्ष**

1. गडचिरोली जिल्ह्यात सर्वाधिक तीन पिढ्या पासून दारिद्रयात जीवन व्यथित घालवणाऱ्या एकूण कुटुंबाचे प्रमाण 47.08 टक्के हे अधिक आहे.
2. दारिद्रय रेषेखालील कुटुंब स्वयंपाकाकरिता केवळ 27.5% कुटुंब गॅसचा वापर करतात.
3. जिल्ह्यातील **BPL** कुटुंबीयांचे शेतीमधून 20,000 ते 50,000 वार्षिक उत्पन्न मिळणाऱ्या उत्तरदात्याची संख्या ही सर्वाधिक 486 म्हणजेच 67.5 टक्के कुटुंब आहेत.
4. गडचिरोली जिल्ह्यातील **BPL** कुटुंबातील बचत गटाकडून कर्ज घेणाऱ्याची संख्या 111 कुटुंबे म्हणजेच 40.22 टक्के प्रमाण हे सर्वाधिक कुटुंब आहेत.
5. गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांना स्वयंसेवी संघटनेच्या (NGO) माध्यमातून केवळ **15** टक्के कुटुंबीयांना योजनेचा लाभ मिळालेला आहे**.**
6. गडचिरोली जिल्ह्यातील **85** टक्के दारिद्रय रेषेखालील कुटुंबियांना स्वयंसेवी संघटनेच्या (NGO) माध्यमातून योजनेचा लाभ मिळालेला नाही**.**

7. जिल्ह्यातील शासकीय विकास योजनेचा लाभ केवळ एकाच योजनेचा लाभ घेणाऱ्याची संख्या **63.58** टक्के कुटुंब लाभार्थी आहे.

**उपाययोजना**

1. गडचिरोली जिल्ह्यातील दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांना वीज, गॅस, घर यासारख्या भौतिक सुविधा देऊन आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने मदत करावी.
2. जिल्ह्यातील रस्ते आणि वाहतुकीची अडचण दूर करावी. ज्यामुळे नवीन व्यापाराला आणि व्यवसायातून रोजगार निर्मितीला चालना मिळेल.
3. जिल्ह्यात देशातील सरकारने वनावर आधारित व्यावसायिक उद्योगातून रोजगार निर्मिती करावी.
4. जिल्ह्यात बीपीएल असलेल्या कुटुंबीयांना कलागुणानुसार शिक्षण व प्रशिक्षण देण्यात यावे.
5. जिल्ह्यातील **BPL** लोकांना सरकारच्या विविध योजनांची माहिती विविध स्वयंसेवी संघटनेद्वारे (एनजीओ) द्वारे देण्यात यावी.
6. सरकारद्वारे प्रधानमंत्री आवास योजनेद्वारे दारिद्र्यरेषेखालील कुटुंबीयांना मोफत घरकुल देण्यात यावे.

**संदर्भ:-**

1. दिसले किरण, "आर्थिक व सामाजिक विकास", दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, फेब्रुवारी 2013
2. थोरात सुखदेव, दलित निरंतर विषमता आणि दारिद्रय, सुगावा प्रकाशन, पुणे, मार्च 2012
3. काचोळे दा.धो, 'भारतीय समाज प्रश्न आणि समस्या' कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, 2005
4. सेन अमर्त्य, आर्थिक विकास और स्वातंत्र्य, राज्यपाल संज काश्मिरी गेट, दिल्ली, 2005
5. आगलावे डॉ.प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर 2000
6. पुरोहित-खांदेवाले डॉ.वसुधा, "भारतीय अर्थव्यवस्था", विद्या पब्लिशर्स, औरंगाबाद
7. गोडबोले वि.ज., दारिद्र्याची मीमांसा: खेर सी.पं.यांच्या दारिद्र्याचा अर्थ या ग्रंथाचे ग्रंथ परीक्षण, अर्थसंवाद, जानेवारी-मार्च 1999
8. जिल्हा गडचिरोली -जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, 2023